“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक


# मुखपत्रिका


कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


।। विद्या धनं सर्व धन प्रधान ।।


मूल्य रु. ५

| क्रमांक १ | वर्ष : ४५ | एप्रिल–जून २०२३ |
|---|---|---|

BOOK PACKET

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


TO,


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.


## APPEAL

### Change of Editorship

We wish to inform all community members that our popular Editor of 'Mukhapatrika' Shri D. N. Nadkarni for the last 45 years from its very inception, has expressed his desire to be relieved from the Editorship. Taking into consideration his advanced age and consequent indifferent health we have reluctantly agreed for the same. At the same time we are glad to announce that Shri Prasad (Pankaj) Mohan Kasbekar (9820501551) has come forward to shoulder the responsibility of editorship henceforth. DNN has kindly agreed to help him till he is firm in the saddle. We request everybody to co-operate with Prasad Kasbekar. The information such as engagements, deaths, change of address, incidents worth publicity in MUKHAPATRA may be conveyed to office for better co-ordination.

We take this opportunity to wish DNN healthy life.

Because of him Sangh and Education Society were getting substantial flow of donations whereby could enhance disbursements for the needy person.

Dev bare karu

Maruti Dalvi,
Chairman
NKGSB Sangha

Devidas Nadkarni,
Chairman
The Education Society

१ एप्रिल २०२३

## अखेरचा हा तुला दंडवत!

कुठल्याही व्यक्तीच्या आयुष्यात निसर्गाच्या काही मर्यादा असणारच. मी याला अपवाद नाही. वयाच्या ८७ व्या वर्षी मला अनेक शारीरिक व्याधीने ग्रस्त केले आहे. त्यामुळे मुखपत्रिकेच्या प्रकाशनाची जबाबदारी यापुढे मला पेलणे अशक्य झाले आहे. सुदैवाने दिंडोशी येथील श्री. प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर यांनी स्वत: होऊन मुखपत्रिकेची धुरा सांभाळायची जबाबदारी स्वीकारली आहे. सुरुवातीला अध्यापिकांचे गरजेपुरते मार्गदर्शन राहणारच आहे. नंतर ते स्वतंत्रपणे चालवतील. सध्याचे रटेल स्वरूप पाहून ते मुखपत्रिका जास्त आकर्षकही करू शकतील. ‘शिष्यात् इच्छेत् पराजयम्’ या उक्तीनुसार ते मुखपत्रिका जास्त मनोरंजक करू शकतील. विशेषत: युवकांचा जास्तीत जास्त सहभाग करण्यावरही त्यांचा भर असेल.

गेल्या वर्ष भरात मुखपत्रिकेचे प्रकाशन करण्यास मला अनेक शारीरिक अडचणी येत होत्या. या प्रसंगी पारल्यातीलच माझे शेजारी श्री. रवी वर्टी यांचे मला अपरिमीत साहाय्य झाले. वर्टींच्या अनुभवाचा फायदा ते कसबेकर यांना देण्याची त्यांनी स्वत: होऊन तयारी दाखविली आहे. उभयतांकडून सांघिक बळाने कार्य सिद्धीला नेण्यास श्री समर्थ असणारच.

या निरोपाच्या औचित्याने मी एन्.के.जी.एस्.बी. संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थांचे आभार मानू इच्छितो. या संस्थांच्या अस्तित्वाशिवाय मी माझी सेवा करूच शकलो नसतो. माझे कार्य पोकळीमध्ये करणे शक्यच नव्हते. या संस्थांमुळेच मला अनेक विद्वान व कर्तबगार मान्यवरांचा सहवास लाभला व अनुभव मिळाला. मुखपत्रिकेचे संकलन करण्यातच

नव्हे तर माझ्या व्यवसायातसुद्धा मला फायदा झाला. मुद्देसूद, मोजक्या शब्दांत व मोजक्या भाषेत आपले लिखाण कसे प्रकट करावे याचे मला शिक्षण मिळाले. त्यातील एक महान् व्यक्ती म्हणजे माझीच आद्याक्षरे असलेले माझे स्व. डी. एन्. नाडकर्णी ऊर्फ दिगंबरमाय. विचारांची खोली, प्रलगल्भता व विस्तार या क्षेत्रात मदतीचा हात धरणारा असा क्वचित्. वेद, उपनिषदे व गीता ते कोळून प्याले होते. त्याची संसारात मेळ कशी घालावी हे मी त्यांच्याकडून शिकलो. ''रुद्र : बुभुक्षितरुपेण अवतिष्टते'' हा मंत्र त्यांनीच माझ्या मनात बिंबवला. संघाकडे एखादा याचक उपस्थित झाला तर रुद्राला करतो तसा त्याचा सन्मान करायला हवा. तो संघाच्या कार्यकारिणी सभासदांची परीक्षाच घेत असतो. त्याला लवकरात लवकर, जास्तीत जास्त, विनासायास लाभ मिळावा याची काळजी घ्यायला हवी.

लता दिदींचे 'मराठा तितुका मिळवावा' या चित्रपटातील लोकप्रिय गीत 'अखेरचा हा तुला दंडवत' या काव्यपंक्तींनी मी मुखपत्रिकेची ४५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर रजा घेतो.

द.ना.नाडकर्णी

द. ना. नाडकर्णी, पारले (निवृत्त संपादक ): ९९६९००६२६०

## संपादकीय

### संपादक श्री. द. ना. नाडकर्णी यांची निवृत्ती

एन.के.जी.एस्.बी. संघ म्हणजेच आपल्या ज्ञातीतील सर्वांचे अत्यंत लाडके व आवडते, प्रिय, सर्वांशी प्रेमाने विचारपूस करणारे व सखोल ज्ञानी तसेच गेली कित्येक वर्षे मोठ्या आपुलकीने, आपले घरचे कार्य असल्याप्रमाणे निस्वार्थपणे 'मुखपत्रिका' संपादित करणारे, तसेच मुद्रक व प्रकाशक अशा कुठल्याच बाबतीत कधीही किंचितही कमी न पडलेले असे तपस्वी श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांनी आपल्या प्रकृती अस्वास्थ्याच्या तक्रारींमुळे संपादक पदाला विराम देत या पुढे विश्राम करण्याचा निर्धार केला आहे.

तरी त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय आपले पानही हालणार नाही हे सत्य कितीही लपवून लपवता येणार नाही. त्यांचे लिखाण, तल्लख बुद्धी, विचार, स्मरणशक्ती व आत्मविश्वास वाखणण्याजोगाच! हे शिवधनुष्य पेलण्याचे सामर्थ्य सहज कुणाला शक्य होणे नाही. तरी श्री. मंगेशाने आम्हाला तसे बळ द्यावे व आमच्या परिने थोडे का होईना, ही 'मुखपत्रिका' पुढे चालवण्याची शक्ती द्यावी हीच श्री चरणी प्रार्थना!

हे पहिले पुष्प वाहताना मला अभिमानही वाटतो की अशा भीष्माचार्यांच्या आशीर्वादाने आम्ही ही 'मुखपत्रिका' अशीच पुढे चालवण्याचा अथक प्रयत्न करू, यात तुम्हां सर्वांच्या सहकार्याची नितांत गरज आहे. तरी माझा तुम्ही पुढील अंकांसाठी संपादक म्हणून स्वीकार कराल अशी आशा बाळगतो तथा अशी तुम्हां सर्वांना नम्र विनंती.

तुमचा आज्ञाधारक,

१ एप्रिल २०२३ **प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर**



## एज्युकेशन सोसायटी – शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे :

१ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ३० जून २०२३

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ३० जुलै २०२३

(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील) याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा, ही विनंती.

**विषय :**

- संगीत, नाटक, नृत्य
- व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण
- राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी.ए. कॉस्टिंग, एन्.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिंग इ.)
- संगणकावर आधारित प्रशिक्षण
- वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास
- जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा
- शैक्षणिक सहल

दहावी–बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कर्जाऊ शिष्यवृत्त्या** : उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (प्रतिवर्षी १,००,०००)
परिदेशातील उच्च शिक्षण रु ५,००,००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी** : गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करून शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
शैक्षणिक पात्रता : बारावी.

विशेष माहितीसाठी कार्यालयांत येऊन चौकशी करावी अथवा २३८७७३०१ वर कार्यालयीन वेळात संपर्क करावा.

# प्रकाश झोत

### चित्रपट सृष्टीत प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या दादासाहेब फाळके प्रशस्तीपत्र यंदा प्रथमच वैद्यकीय क्षेत्रात दैदीप्यमान कारकीर्दीबद्दल डॉ. गंडभीर यांना प्रदान

चित्रपट सृष्टीत दादासाहेब फाळके स्मृतीप्रीत्यर्थ देण्यात येणारे प्रशस्तीपत्र हे प्रतिष्ठित समजले जावे. ज्या मान्यवरांचे इतर क्षेत्रांत महत्त्वाचे योगदान असेल अशांनाही प्रशस्तीपत्र देण्याचे यंदा विश्वस्तांनी ठरविले. त्यानुसार वैद्यकीय क्षेत्रांत दैदीप्यमान कारकीर्द बजावणारे शिवाजी पार्क येथील डॉ. निनाद अनंत गंडभीर यांना पहिलेच प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. हे प्रशस्तीपत्र १० जानेवारी रोजी दादासाहेबांचे नातू श्री. चंद्रशेखर पुसाळकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. गेल्या चार तपाहून अधिक काळापासून डॉक्टर परळ भागातील गरीब व सर्वसामान्य रुग्णांची सेवा अत्यंत प्रभावीपणे व निस्वार्थीपणे बजावीत आहेत. त्यांच्या या सेवाव्रती कार्याचा गौरव म्हणून प्रथमच वैद्यकीय क्षेत्रातील गुणवंतांना प्रशस्तीपत्र देण्यात येत आहे.

### श्री जगदीश व अर्जुन नाडकर्णी यांच्या रसायन उत्पादन कारखाना सुवर्ण महोत्सव

आपण सगळे सर्वसामान्य पांढरपेशे कारकून म्हणजे अनंतफंदी यांचे अनुयायी. 'बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडू नको । संसारामधि ऐस अपुला उगाच भटकत फिरू नको।।' या पार्श्वभूमीवर आपल्यापैकी एका बांधवाने बिकट वाट सोडून दुर्दम्य परिश्रमाने, चिकाटीने व सचोटीने उद्योगक्षेत्रात प्रवेश करणे व त्यात यशस्वी होणे हे खरे कौतुकास्पद. या कौतुकास पात्र होऊन पितापुत्र श्री. जगदीश व अर्जुन नाडकर्णी. श्री. जगदीश यांनी ५० वर्षांपूर्वी अरोफिल पॉलिमर्स हा कारखाना सुरू केला. उद्योगक्षेत्रात उपयोगी असलेले औद्योगिक अॅटोसिसचे ही कंपनी उत्पादन करते. हा कारखाना पुणे येथे आहे व तो पूर्णपणे प्रदूषण मुक्त असा आहे. त्यांची वेगवेगळ्या उपयोगासाठी ९ प्रकारची उत्पादने आहेत व त्यांची उत्पादने सहा देशात निर्माण केली जातात. सुवर्णजयंती प्रसंगी या कारखान्यांची उत्तरोत्तर भरभराट होवो ही श्रीमंगेशचरणी प्रार्थना.

### महिला दिनानिमित्त मुलुंड येथील ज्येष्ठ नागरिक संघातर्फे ख्यातनाम गायिका सौ. स्मिता वाघ यांना उत्तम कलाकार हा पुरस्कार

आपल्या ज्ञातीच्या अनेक कार्यक्रमांतून आपल्या सुमधूर आवाजात गाणी सादर करणाऱ्या आपल्या सगळ्यांच्या आवडत्या गायिका सौ. स्मिता उदय वाघ यांना महिला दिनाप्रसंगी ज्येष्ठ नागरिक संघ मुलुंड येथे शालिनीताई गुप्ते यांच्या स्मरणार्थ असलेला 'उत्तम कलाकार' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. स्मितानी आपल्या मनोगतात आपल्या गुरुंचे स्मरण केले आणि हा पुरस्कार पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरेल असे नमूद केले. या कार्यक्रमाची सांगता स्मिता यांच्या सुरेल व सुमधूर भैरवीने करण्यात आली. स्मिताचे खूप खूप अभिनंदन!

प्रेषक : मंजिरी कुलकर्णी, ठाणे



## दिंडोशी येथील श्री. प्रसाद कसबेकर यांचे ई–पुस्तक

प्रसाद मोहन कसबेकर यांनी 'चाकावरची दौड' नावाचे ई–बुक आपल्या वाढदिवसाच्या दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर २०२२ रोजी लिहून प्रसिद्ध केले आहे.

हे पुस्तक मराठीमध्ये लिहिले असून ह्या पुस्तकाच्या नावाचा अर्थ गेली पंचेचाळीस वर्षे त्यांनी टायर इंडस्ट्रीमध्ये मार्केटिंग विभागात जे वेगवेगळे अनुभव घेतले त्यामध्ये बरेच गंमतीशीर किस्से असे घडले की जे न लिहिता राहवले नाही.

त्यांनी सर्व प्रकारचे टायर्स सर्व प्रकारच्या गिऱ्हाईकांना मग ते भारतात असो वा बाहेरील देशात, जसे, मस्कत, दुबई, घाना, नायजेरीया  वगैरे ठिकाणी विकले व ते विकताना जे गंमतीशीर किस्से घडले त्याचे वर्णन येथे करण्याचा प्रयत्न केला आहे.

हे किस्से एक एक करून आपल्या मुखपत्रिकेच्या अंकांमधून प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न आहे. तरी आपण यांचा मोठ्या मनाने स्वीकार कराल ही अपेक्षा.

धन्यवाद!

हे पुस्तक जर संग्रही ठेवायचे असेल तर खाली दिल्याप्रमाणे तुम्हाला उघडता येईल

श्री. कसबेकर यांचे पहिले ई–पुस्तक 'चाकावरची दौड' हे 'Bronato.com' तर्फे 'किंडल'वर प्रकाशित झाले असून सध्या निव्वळ एका टिचकीने तुम्हाला पुस्तक घेता येईल. मूल्य रु. १२०/–.

किंडलसाठी दोन पद्धती आहेत –

**१) पहिली पद्धत (एकदम सोपी)**

किंडल अॅप डाऊनलोड करून त्यात CHAKAVARACHI DAUD असे इंग्रजीमध्ये टाईप करून शोधा. कव्हरपेजला टिचकी मारून पुस्तक घ्या.

**२) दुसरी पद्धत –**

खाली दिलेल्या लिंकवर टिचकी मारा.

https://www.amazon.in/dp/boblmb4n1p / किंडल अॅप डाऊनलोड करून ज्या अकाऊंटने पुस्तक मिळवले त्याच अकाऊंटने अॅप मध्ये लॉगइन करा.

ई–पुस्तक मिळवण्यात काही अडचण आल्यास BRONATO प्रतिनिधीला ९९७००५१४१३ वर संपर्क करा.

## ठाणे मंचने आयोजित केलेली एक दिवसाची सहल
## – रोहिणी कृषी पर्यटन केंद्र, वसई

रविवार दिनांक ८ जानेवारी २०२३ रोजी जोगेश्वरीमधील भगिनींनी ठाणे मंचाच्या सहलीस जाण्याचे ठरविले. स्थळ होते 'रोहिणी कृषी पर्यटन केंद्र, वसई.' कोरोनामुळे सलग दोन वर्षे सहल होऊ शकली नव्हती. त्यामुळे सहलीची तारीख कळल्यावर सर्वांना आनंद झाला.

सकाळी ८–८.३० च्या दरम्यान माहीम, ठाणे, जोगेश्वरी येथून प्रत्येकी एक बस वसईस जाण्यास निघाली.

माहीम बसची व्यवस्था श्री. अरुण बोरकर यांनी तर ठाण्याच्या बसची व्यवस्था श्री. अरुण तेलंग यांनी आणि जोगेश्वरी बसची व्यवस्था आणि प्रवाशांची सुखसोय श्री. प्रसाद गायतोंडे यांनी पाहिली. सर्वांचे आभार.

ठीक साडेनऊच्या दरम्यान तीनही बसेस एका मागून एक रोहिणी कृषी पर्यटन केंद्राला पोहोचल्या. तेथील वातावरण आल्हाददायक होते. वनश्रीने नटलेला रिसॉर्ट पाहून आनंद झाला. आत आल्यावर एक मोठा हॉल होता. तेथे अनेक टेबल्स व खुर्च्या ओळीत मांडून ठेवल्या होत्या. आयोजकांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही आमचे सामान आरक्षित केलेल्या दोन खोल्यांमध्ये ठेवून फ्रेश होऊन आसनस्थ झालो.

सहलीचे आयोजक श्री. सुरेश पालेकर यांनी श्री. राजेश दिवेकर, श्रीमती अश्विनी वाघ, श्री. अरूण बोरकर, श्री. अरूण तेलंग, श्री. प्रसाद गायतोंडे यांची ओळख करून दिली. उपस्थितांनी टाळ्या वाजवून त्यांना "All the Best" करून नवीन वर्षाचे अभिष्टचिंतन केले.

एकमेकांची ओळखदेख चालू असताना गरमा गरम चहा/कॉफी, मिसळपाव, भुर्जीपाव हा नाश्ता आला. त्यावर सर्वांनी ताव मारला. नाश्ता चविष्ट होता.

श्री. सुरेश पालेकर यांनी त्यांच्या खास गोवनकोकणीमध्ये दिवसभरात आयोजिलेल्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. त्याप्रमाणे एक गट वज्रेश्वरी देवीच्या दर्शनास जाण्यास बसमध्ये बसला. आम्ही काही जण रोहिणी कृषी पर्यटन केंद्राचे गाइड श्री. रोहित गुप्ते यांच्याबरोबर भटकंतीस निघालो. सुरुवातीस एका हापूस आंब्याच्या झाडाकडे उभे राहिलो. हापूस आंब्याच्या झाडास पायरी आणि केसर आंब्याचे कलम केले होते. त्यामुळे त्या झाडावर वेगवेगळ्या प्रकारची पाने दिसत होती.

तुळस सर्वांनाच प्रिय. तिथे तुळशीचे सात–आठ प्रकार होते. दुर्मिळ वनस्पती आणि वृक्षांचे जतन व संवर्धन करण्याची तळमळ दिसून आली. तेथील शेतात अनेक प्रकारच्या भाज्या



तसेच पालेभाज्या दिसल्या. त्यामुळे घरी जाताना या सर्व प्रकारच्या भाज्या घेतल्या ''हे सांगणे न लगे.'' दुपारी दोन–सव्वादोनच्या दरम्यान आम्ही परत केंद्रात आलो तोपर्यंत वज्रेश्वरी बसचे सभासद हजर झाले होते.

थोड्याच वेळात सुग्रास जेवण झाले. शाकाहारीसाठी काळ्या वाटाण्याची उसळ, कुर्मा भाजी, चपाती, तांदळाची भाकरी, डाळभात आणि श्रीखंड असा मेनू होता. मांसाहारींना हे पदार्थ अधिक चिकन आणि खास चुलीवरचे मटण असा चौरस आहार मिळाला. सर्वजण जेवण जेवून तृप्त झाले. ''अन्नदाता सुखी भव''

थोड्या विश्रांती नंतर ''संगीत खुर्ची''चा खेळ सुरू झाला. महिला खेळाडूंमध्ये प्रथम विजेत्या ठरल्या शुभदा (अरुणा) कसबेकर. द्वितीय क्रमांक सुषमा नाईक यांनी पटकावला. पुरुषांमध्ये प्रथम क्रमांक श्री. सतीश वागळे, दुसरा क्रमांक लहानगा अथर्व याला मिळाला. म्युझिकल चेअर नंतर विविध करमणूकीचे कार्यक्रम सुरू झाले.

प्रथम अमेय नाडकर्णी या युवकाने फार सुंदर गिटार वादन केले. त्यानंतर शांभवी वागळे, प्रदीप दाभोळकर व तेजश्री कुलकर्णी यांनी सुरेल आवाजात हिंदी गाणी पेश केली. त्यांना वाद्याची साथ दिली सतीष वागळे व अमेय नाडकर्णी यांनी. त्यामुळे सर्व वातावरण संगीतमय झाले.

या आनंदात भर घातली श्री. सतीश वागळे यांनी बासरीवर 'इतनी शक्ती हमे देना दाता' हे गाणे वाजवले. त्यानंतर श्रीमती अपर्णा बोरकर, श्रीमती तारा गायतोंडे यांनी मधूर आवाजात प्रसिद्ध मराठी गाणी म्हणून सर्वांची दाद मिळवली.

श्रीमती दीपा मुजूमदार यांनी ''मेलो माझे हनीमून रावन गेलो'' ही वात्रटिका सादर केली. सर्वांची हसून पुरेवाट झाली. श्री. अरूण कसबेकर यांनी सपत्नीक स्वत:चे मनोरंजक किस्से सांगून कार्यक्रमाची सांगता केली.

सर्व स्पर्धक व कलाकारांना श्री. अरुण बोरकर यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

अश्विनी वाघ यांनी दोन ते तीन दिवस राहण्याची पिकनीक स्पॉटची नावे सांगितली. जून महिन्यात ती सहल काढावी असे ठरले. ती सहल यशस्वी करण्यासाठी ठाणे मंच कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीबद्दल सर्व उपस्थितांनी आभार मानून स्वगृही जाण्यास निघाले.

**सौ. हेमांगिनी द. कुलकर्णी,** जोगेश्वरी

## ठाणे मंच एक आगळावेगळा उपक्रम

अलीकडेच ठाणे मंचाने एक आगळावेगळा कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवले. आपल्या समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करायचा आणि त्यांनी सुचविलेल्या गाण्यांचं सादरीकरण मंचाच्या कलाकारांनी करायचं. दोघींचा/दोघांचा सत्कार ठाणे मंच करेल.

मुखपत्रिकेतून ही बातमी आल्यानंतर पटापट ज्येष्ठ नागरिकांना आपल्या आवडीच्या गाण्यांची नावे कळविली. कलाकारांनी सुद्धा आपली नावे दिली. आम्ही पुढील कार्यवाहीस लागलो. खरी अडचण आली ती म्हणजे काही ज्येष्ठांनी सुचविलेली गाणी तरूण कलाकारांना महीत नव्हती. तर काहींनी आपलं वेगळं गाणं म्हणू असे सुचविले. आम्हांला त्यामुळे थोडी जुळवाजुळव करावी लागली.

कार्यक्रमाला कोणीतरी वेगळा सन्माननीय पाहुण्यांच्या शोधात असताना गोव्यातील सर्जनशील लेखिका श्रीमती मीरा प्रभूवेर्लेकरांचं नाव पुढे आलं. त्या माहेरच्या तेलंग, कारवार असे आमच्या DN नी सांगितले.

मीराताईंनी आमचे आमंत्रण स्वीकारले आणि रविवार २६ फेब्रुवारी २०२३ रोजी तेंडुलकर सभागृहात सकाळपासून कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. सुरेश पालेकर यांनी सन्माननीय पाहुण्या श्रीमती मीरा प्रभूवेर्लेकर, सन्माननीय श्री. अरुण कसबेकर आणि उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात छोट्या स्वरा साळगांवकरने सरस्वती वंदना आणि गणेश वंदना या गाण्यांवर नृत्य सादर करून उपस्थितांची वाहव्वा मिळवली.

लगेच मुलाखतीसाठी श्रीमती मीराताई, श्री. अरुण कसबेकर आणि मुलाखत घेणारे श्रीमती शैला नाडकर्णी, श्री. रवीन्द्र बोरकर यांना व्यासपीठावर सन्मानाने आणण्यात आले. श्रीमती मीरा तेलंग, प्रभूवेर्लेकर यांची मुलाखत श्रीमती शैलजा नाडकर्णी आणि श्री. रवीन्द्र बोरकर यांनी घेतली.

श्रीमती मीरा यांनी आपल्या लेखनाविषयी तसेच त्यांच्या वैयक्तिक अनुभवातून निर्माण झालेल्या लेखन स्फूर्तीबद्दल मनमोकळेपणाने चर्चा केली व सर्व श्रोत्यांकडून त्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला.

त्यांचा जन्म कारवारचा तसेच बालपणही तिथलेच असून विवाहोत्तर जीवन गोव्यात गेले. त्याविषयी त्यांना आलेल्या अनेक अनुभवांच्या व भाषांतील फरकामुळे झालेल्या मजेदार प्रसंगांच्या आठवणी त्यांनी सांगितल्या आणि श्रोत्यांची कमणूक केली. बालपणी त्यांच्या अंगी उपजतच चांगले गायन, वक्तृत्व, नृत्य आणि नाट्य असे कलागुण असूनही विवाहोत्तर आपल्या संसारामध्ये जुळवून घेताना त्यांनी त्या गुणांना मुरड घातली. पण कित्येक वर्षांनंतर उशीरा का होईना, त्यांच्या उपजत कलावृत्तीने त्यांच्यातील लेखक जागा केला.
सुरुवातीला त्यांनी गोवा व महाराष्ट्रातील वृत्तपत्रांतून छोटे-छोटे ललितलेख लिहायला सुरुवात केली. वाचकांच्या चांगल्या प्रतिक्रिया मिळायला लागल्यानंतर त्यांचा उत्साह वाढला व त्यांचे लेखनही वाढू लागले.

कालांतराने अनेक रसिक वाचकांच्या वृत्तपत्रसंपादकांच्या व प्रसिद्ध ललित-लेखक (कै.)



श्री. रवीन्द्र पिंगे यांनी दिलेल्या प्रोत्साहनाने व पुढील मार्गदर्शनामुळे त्यांनी अनेक लेख लिहिले आणि आत्तापर्यंत ते एकूण ६ पुस्तकांद्वारे प्रकाशितही झाले आहेत. सध्या ललितलेखना व्यतिरिक्त त्या आकावाणी व दूरदर्शनसारख्या प्रसारमाध्यमांतून ललितलेख वाचन करीत आहेत आणि त्यांना वाचकांचा तसेच श्रोत्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळतो.
या मुलाखतीच्या प्रसंगी त्यांनी त्यांच्या एका हृदयकथेचे वाचन केले आणि संमेलनात आलेल्या प्रेक्षकांनीही तिला चांगली दाद दिली. मीराताईंच्या पसंतीचे गाणे 'ये जिंदगी, गले लगा ले' विदुला कामत हिने सादर केले.

दुसऱ्या सत्रात सभागृहातील सर्वात ज्येष्ठ ९३ वर्षीय श्रीमती तारा गायतोंडे यांचा पहिला मान देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी खणखणीत आवाजात देशभक्तीपर गीत सादर केले. प्रेक्षकांनी जागेवरून उठून जोरात टाळ्या वाजवून त्यांची प्रशंसा केली. (Standing ovation).

यानंतर श्रीमती नीलिमा नाडकर्णी यांनी सुचविलेले गाणे तेजश्री कुलकर्णी गायल्या.

मंगल वागळे – विघ्नेश पिकळे
प्रभा कसबेकर – ज्योती सुखठणकर
सुहास नाडकर्णी – प्रज्ञा वागळे
द. ना. नाडकर्णी – प्रिया/प्रभात कुलकर्णी
सतीष वागळे – प्रदीप दाभोळकर
मंगेश तेलंग – जयश्री तेलंग
पुष्पा तेलंग – सुवर्णा कुरडेकर
किशोर कुलकर्णी – शांभवी बोरकर-वागळे
अरूण बोरकर – विद्या मुर्कुंडे
वैशाली दडकर – वसुधा कामत
निशिकांत नाडकर्णी – मेधा सोवनी
रंजना वागळे – अनिल वैष्णव
विठ्ठल पालेकर – शुभदा वैष्णव

अशी एकामागून एक गाणी कराओके ट्रेकवर गायली गेली.

(प्रकृती अस्वास्थ्यामुळे किंवा काही कारणामुळे श्री. द. ना. नाडकर्णी. मंगेश तेलंग, किशोर कुलकर्णी कार्यक्रमास येऊ शकले नाहीत.)
कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. राजेश दिवेकर, गिरीष रेगे, ज्योती सुखठणकर, अश्विनी वाघ, प्रसाद गाायतोंडे, अरुण तेलंग, विदुला कामत, हेमांगी कुलकर्णी आणि सुरेश पालेकर यांनी भरपूर मेहनत घेतली.
रुचकर नाश्ता, स्वादीष्ट प्रीतीभोजनाचा आस्वाद घेऊन सर्व स्वगृही परतले.

**सुरेखा सु. पालेकर**, ठाणे. – ९०८२६६२०१९

## क्षण वेचिता आनंदाचे : मनोगत

ठाणे मंचचे अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ पालेकर यांच्या कानावर 'कुठुनशी आली मम नामाची कुणकुण' हे मला नाही माहीत. परंतु मीरा प्रभूवेर्लेकर ही गोव्यातली एक लेखिका मूळची कारवारची कन्या आहे हे समजताच त्यांची पावलं त्यांच्या गोवा भेटी दरम्यान म्हापशाला माझ्या घराकडे वळली. ठाणे मंचच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यासाठी त्यांनी मला विचारताच मी तात्काळ ते स्वीकारलं आणि मोकळी झाले.

मोकळी झाले खरी परंतु मुंबईमधल्या कार्यक्रमात सहभागी होण्याची ही माझी पहिलीच वेळ असल्याने मनामध्ये काही प्रश्नांनी घुसखोरी करून धुडगूस घालायला सुरुवात केली. पण क्षणभरच मनात उमटलेल्या प्रश्नांना ओठांचा उंबरठा ओलांडू न देता ओठातूनच त्यांना माघारी परतून लावले आणि मी 'सुशेगाद' झाले या विचारानी की, आज मुंबईकर झालेली मंडळी मूळची कारवारकर. म्हणजे आपलेच गणगोत तर आहेच! आणि तसंही प्रत्येक आई–वडिलांना आपल्या लेकराने एखादी लहानशी गोष्ट जरी केली तरी त्याचं कौतुक चार जणांच्या कानावर घातल्याशिवाय सुख लागेल का? माझ्या बाबतीतही तसंच घडलं असावं. या कारवारच्या कन्येनी गोव्यामध्ये जाऊन साहित्य क्षेत्रात पाऊल टाकून भलेही कणभर काम केलेले असे ना का, तिचं कौतुक व्हायला हवं. या आपुलकीच्या आणि उदात्त भावनेने त्यांनी मला या खुर्चीवर बसण्याचा मान दिला आणि तुम्हाला सांगते, त्या साडेतीन तासांत मी क्षणाक्षणाला आनंदाचे कण वेचले. हा माहेरचा अनमोल आहेर माझ्यासाठी बहुमोल असल्याने तो माझ्या खास अशा आठवणींच्या कुपीत बंदिस्त झालाय. ठाणे मंचचे अध्यक्ष सुरेशभाऊ आणि संपूर्ण टीम यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

त्या दिवशी ज्येष्ठ रसिकांच्या पसंतीची गाणी उत्तम रित्या सादर केली. शिवाय त्या त्या गाण्यांचा रसिकांना मंचावर पाचारण करून त्यांचाही सत्कार करण्याचा उपक्रम अभिनव असाच होता. शैलाताई आणि रवीन्द्रभाऊ यांनी मोठ्या खुबीने विचारलेले प्रश्न आणि त्यांना दिलेल्या उत्तरांवर रसिकांची मिळालेली उत्स्फूर्त दाद आणि टाळ्या यांनी मन खरोखर भारावून गेलं.

त्या दिवशी कित्येक परिचित अपरिचितांच्या घडलेल्या भेटी ही तर माझ्यासाठी पर्वणीच ठरली. कारण माझ्या आलेल्या वडिलांच्या पिढीतील व्यक्तींचा कोण नातू, कोण पणतू वगैरे आपल्याला परिचय देऊन माझ्यावर टाकून गेले. श्री. अरुणभाऊ कसबेकरांकडून त्यांचं पुस्तक अनपेक्षित भेट होती. त्यांनाही माझा सादर प्रणाम!

दत्ताभाऊ नाडकर्णी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्या दिवशी येऊ शकले नाहीत. त्यांची



अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली. त्यांनी वेळोवेळी माझ्या प्रकाशित झालेल्या पुस्तकांची असो, मिळालेल्या बक्षिसांची असो वा मी माझ्या दिवंगत सुहृदावर लिहिलेल्या मृत्यूलेखाची असो, दखल घेऊन मुखपत्रिकेत प्रसिद्धी दिली आणि साहजिकच मी साऱ्या कारवारकर बांधवांपर्यंत पोहोचू शकले. ते वाचून कितीतरी जणांचे अभिनंदनपर फोन आले ज्यांची नावं मी बऱ्याचदा नुसती ऐकली होती, त्यांचेही. अमेरिकेहून कै. मोरेश्वरभाऊ नाडकर्णी यांचाही. तर मुद्दा हा की, या निमित्ताने स्नेहबंध जुळले. आपुलकीचं संचित पदरी पडलं. आनंदाच्या कणाकणांनी भरलेली ओंजळ घेऊन गोव्यात परतले.

पुनश्च सर्वांचे आभार मानून इथेच थांबते.

**मीरा निषीध प्रभूवेर्लेकर** – ९४२०२४२३९६.

### विवाह / वाङ्निश्चय

**पृथ्वीज प्रदीप पिकळे, बडोदा** व **अक्षता शशिकांत काळे, गोरेगांव**


### नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशबाबतीच्या नियमानुसार 'नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. वृत्तविलास' त्रैमासिकाचे प्रकटनर

Form IV Rule 8

१. **प्रकाशन स्थळ** : दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४

२. **प्रकाशन अवधी** : त्रैमासिक


३. **मुद्रक, प्रकाशक आणि संपादक** : प्रसाद मोहन कसबेकर राष्ट्रीयत्व : भारतीय

**पत्ता :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

४. **मालक** : दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

मी प्रसाद मोहन कसबेकर या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

मुंबई, १ मार्च २०२३ **प्रसाद मोहन कसबेकर** – प्रकाशक






# MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

MSIPL

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




Can we help you to achieve your goal???

& your goal is....

Let's reach nearer


To your highest GOAL!!!

Step by step....

*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate | Growth Rate | Growth Rate |
|---|---|---|---|---|
| | | 8% | 12% | 15% |
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




***Indian Equity market has given average 16% return s in last 32 year s...***


Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

## वार्षिक स्नेहसंमेलनाची क्षणचित्रे

तपशील गेल्या अंकात



प्रमुख पाहुण्या नीलिमा नाडकर्णी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन. शेजारी शिरीष वाघ, मारुती दळवी, देविदास नाडकर्णी, डॉ. विवेक कुलकर्णी




संघाचे कार्याध्यक्ष श्री. मारुती दळवी यांच्यातर्फे श्रीमती नाडकर्णी यांचा सत्कार



प्रमुख पाहुण्या श्रीमती नाडकर्णी यांचे भाषण.
शेजारी देविदास नाडकर्णी व मारुती दळवी





उल्लेखनीय नैपुण्याबद्दल कु. आर्या वर्टी हिला प्रमुख पाहुण्यांतर्फे पारितोषिक




डॉ. निनाद गंडभीर यांना दादासाहेब फाळके प्रशस्तिपत्रक प्रदान (तपशील पृ. ५)




सौ. स्मिता वाघ यांना 'उत्तम कलाकार' पुरस्कार.
लता पिकळे, स्मिता वाघ, सुधा दळवी, मंजिरी कुलकर्णी (तपशील पृ. ५)

# ठाणे मंच एक आगळावेगळा उपक्रम

(तपशील पृ. ११ वर)




प्रमुख पाहुण्या
श्रीमती मीरा प्रभूवेर्लेकर. बाजूला
श्री. अरुण कसबेकर

श्रीमती तारा गायतोंडे यांचा
श्रीमती मीरा प्रभूवेर्लेकर तर्फे
सत्कार. सोबत प्रसाद गायतोंडे,
सुरेखा पालेकर, रवीन्द्र बोरकर






प्रकट मुलाखत
श्री. अरुण कसबेकर,
श्रीमती मीरा प्रभूवेर्लेकर,
श्रीमती शैलजा नाडकर्णी व
श्री. रवीन्द्र बोरकर.



स्वयंसेवक




## प्रेक्षकवर्ग





## हिंदू हायस्कूल, कारवार स-रजत जयंती शताब्दी महोत्सव

हिंदू हायस्कूल, कारवार ही ख्यातनाम शाळा कै. वामन मंगेश दुभाषी व कै. हरी बाबू कामत ह्या उभयतांनी २-१-१८९७ रोजी सुरू केली व पुढे कै. मंगेश पुंडलीक कुळकर्णी (बुना मास्तर) व त्यांचे बंधू कै. धिम्मण्णा वागळे ह्या बंधुद्वयांनी ही शाळा अत्यंत लोकप्रिय करून १९४४ पर्यंत चालविली. पुढे १९४४ त कारवार एज्युकेशन सोसायटीची स्थापना होऊन त्या संस्थेतर्फे ही शाळा, सुमती दामले गर्ल्स हायस्कूल (१९६६) व बालमंदीर (१९५२) प्रथम मराठी माध्यम व आता संपूर्ण इंग्लीश माध्यम अशा ३ शाळा उत्तम प्रकारे चालविल्या जात आहेत. संस्थेचे पहिले अध्यक्ष रावबहादूर गणपतराव तेलंग होते. २०२२ साली हिंदु हायस्कूलला १२५ वर्षे पूर्ण झाली. परंतु आकस्मिक आलेल्या कोरोनाच्या संक्रमणामुळे गेल्यावर्षी हा महोत्सव साजरा करता आला नाही. यंदा जानेवारी २१, २२, २३ ह्या तीन दिवशी धुमधडाक्यात शाळेचा स-रजत जयंती शताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला.

शनिवार दि. २१-१-२३ रोजी सकाळी १० वा. यथायोग्य प्रकारे मुख्य अतिथी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश जस्टीस एन. व्ही. रामण्णा ह्यांच्या हस्ते ह्या महोत्सवाचे उद्घाटन झाले. रीतसर प्रार्थना व स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सर्वोच्च न्यायालयाचे वकील श्री. देवदत्त कामत ह्यांनी जस्टीस रामण्णांचा परिचय करून दिला. श्री. रामण्णांनी आपल्या ओजस्वी व सुंदर शैलीत शिक्षणाविषयी खूप मुद्दे मांडले. त्यांनी प्रमुख भर दिला तो मुलांच्या सर्वांगीण प्रगतीकडे लक्ष द्या, ते भारताचे भावी जबाबदार नागरिक आहेत. घरी पालक व शाळेत शिक्षक ह्यांनी मुलांच्या दैनंदिन वागणुकीत लक्ष घालावे.

त्यांचा दुसरा मुद्दा होता, देशात समाज माध्यमांमध्ये अनेक खोट्या व निरर्थक बातम्या पसरविल्या जात आहेत त्यापासून सावध रहा. त्यांची योग्य ती शहानिशा करून घ्या. तिसरा व महत्त्वाचा मुद्दा होता तो मुलांसाठी. ते म्हणाले आता (Mother) मातृभूमी (Mother Land) व मातृभाषा (Mother Toungue) ह्या तीन गोष्टी जीवनात अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यातील एकाशी सुद्धा दुर्लक्ष करू नका.

दुसरी अतिथी होती, डॉ. ऊर्वी जंगम. बालमंदीरच्या प्रिंसिपल श्रीमती अंजली भावे ह्यांनी यथायोग्य नि समर्पक शब्दांत त्यांचा परिचय करून दिला. डॉ. ऊर्वी जंगम ह्या स्वत: अंध असून त्या Executive Director & Co-Founder Aesthesis Foundation For Visually Impaired, Mumbai. त्यांनी अंधत्वामुळे कसे हाल होतात हे तर सांगितलेच परंतु अंधत्वावर मात करीत



आपण M.A., PhD. केल्याचे सांगितले. ते सुद्धा ब्रेल लिपी शिवाय. तिची कहाणी अंधानाच नव्हे तर डोळसांना सुद्धा स्फूर्ती देणारी होती.

श्रीमती रुपाली नाईक MLA सन्माननीय अतिथी. त्यांचे पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे १२ वाजता आगमन झाले. त्यांनी आपल्या भाषणात हिंदू हायस्कूल ही विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधणारी शाळा असून आपले २ भाऊ चेंडीयाहून इथे येऊन शिक्षण घेत होते हे अभिमानाने सांगितले. तसेच शाळेच्या ह्या महोत्सवास आपली वैयक्तिक रु. १ लाखाची देणगी जाहीर केली.

जस्टीस रामण्णा त्यांना लवकर निघायचे होते म्हणून त्यांच्या हस्ते स-रजत जयंती शताब्दी महोत्सवानिमित्त छापण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

नंतर संस्थेचे अध्यक्ष श्री. एस्. पी. कामत ह्यांनी शाळेच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेतला. तसेच आजी-माजी विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रगती व उन्नतीसाठी सढख हस्ते धनसहाय्य करण्याचे आवाहन केले. त्यानंतर संस्थेचे सचीव श्री. अनिरुद्ध हळदीपूरकर ह्यांनी अतिथी, उपस्थित व सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

संध्याकाळी ६ ते ७.३० दरम्यान शाळेच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा करमणुकीचा शानदार कार्यक्रम झाला.

त्यानंतर ७.३० नंतर अनेक पुरस्कार प्राप्त विजेत्यांचे श्रीमती मंजुषा कुलकर्णी पाटील, पुणे यांच्या हिंदुस्थानी शास्त्रीय गायनाची कन्नड गीतांचा श्रवणीय कार्यक्रम झाला व श्रोते मंत्रमुग्ध झाले.

त्या ३ दिवसांच्या महोत्सवाप्रीत्यर्थ संस्थेचे सचीव श्री. अनिरुद्ध हळदीपूरकर ह्यांचे परमपूज्य वडील गोपाळ कृ. हळदीपूरकर ह्यांनी आत्मीयतेने व मेहनतीने आपल्या घरातच अनेक वस्तूंचे संग्रहालय बनविले आहे त्या विविध वस्तूंचे प्रदर्शन शाळेच्या वर्गातून भरविण्यात आले होते. त्यात राजा रवि वर्मा ह्यांची Paintings व महात्मा गांधींच्यावर आधारित १२४ विविध प्रकारची पोष्टाची तिकिटें हे वैशिष्ट्य होते.

रविवार दि. २२-१-२०२३ रोजी सकाळी १० ते १.३० व १२.३० ते ४.३० च्या दरम्यान Skill Development ह्या विषयावर शैक्षणिक सेमिनार भरविले गेले होते. अनेक नामवंत शिक्षण तज्ज्ञांनी त्यांत भाग घेतला होता. हा अति भन्नाट कार्यक्रम झाला.

संध्याकाळी ६ ते ७.३० शाळेचे आजी-माजी विद्यार्थ्यांकडून शानदार करमणुकीचा कार्यक्रम झाला. कथ्थक Dancer & Teacher, Founder of Kalavati School of Dance &

Music Hyderabad व त्यांच्या नृत्य कार्यक्रमास प्रेक्षकांनी भरपूर दाद दिली.

सोमवार दि. २३-१-२०२३ संध्याकाळी ५ ते ६ ह्या वेळेत समारोपाचा कार्यक्रम होता. मुख्य पाहुणे डॉ. नितीन पिकळे अध्यक्ष, कारवार नगरपालिका व अध्यक्षस्थानी श्री. एस्.पी. कामत वकील व संस्थेचे अध्यक्ष विराजमान झाले होते. उभयतांनी विद्यार्थ्यांना शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झटण्याचे आव्हान केले व ह्या शाळेच्या विद्यार्थी म्हणून देशाचा उत्कृष्ट नागरिक बनण्याचे आवाहन केले. त्यानंतर ६ ते ९ ह्या वेळेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी अतिसुंदर विविध मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांकडून वाहव्वा मिळविली.

अशाप्रकारे विविध कार्यक्रमांनी नटलेल्या ह्या २ दिवसांच्या समारंभाची यशस्वी सांगता झाली.

२१ व २२ तारखेला संस्थेने उपाहार, मध्यान्ह जेवण व संध्याकाळी चहाची व्यवस्था केली होती. सर्व पदार्थ कारवारी पद्धतीचे. २१ तारखेस सकाळी, इडली, वडा, शिरा, हलवा. २१ तारखेस जेवणास तांदळाची भाकरी, जोंधळा भाकरी, काजू सुकी भाजी खोळंबा साखरभात, मडंगणे तर २२ तारखेस मत्स्याहारी जेवण सुंगटा आंबट, कालवा सुके व तळलेले बांगडे शिवाय शाकाहारी-मूगा भाजी, फ्लॉवर सुकी भाजी व पुरणपोळी.

ह्या स-रजत जयंती शताब्दी महोत्सवासाठी शाळेचे आद्य संस्थापक कै. वामन मंगेश दुभाषी ह्यांचे पणतू वामन (किरण) भालचंद्र दुभाषी व त्यांच्या पत्नी डॉ. अपर्णा सह मुंबईहून मुद्दाम आले होते.

तसेच शाळेचे माजी विद्यार्थी श्री. किशोर दिगंबर कुळकर्णी (माजी अध्यक्ष दि. एन्. के. जी. एस. बी. बँक) आपली पत्नी सौ. सीमा सह खास करून आले होते.

त्याचप्रमाणे १९८० नंतरचे खूप विद्यार्थी-विद्यार्थिनी मुंबई, पुणे, हुबळी, बेंगळुरु, गोवा व अन्य गांवाहून मुद्दामहून समारंभास हजर राहिले होते. त्यात डॉक्टर्स, इंजिनिअर्स, सरकारी अधिकारी व अन्य असे सर्व थरांतील माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती व सक्रिय सहाय्य त्यामुळे हा कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडला. सर्वांचे आभार.

**शांताराम (अरुण) कुळकर्णी**

कारवार

७९७२४६८७८२



## विविध लेख पाठवण्या बद्दलचे निवेदन

जास्तीत जास्त सभासदांना "**मुखपत्रिके**" मध्ये भाग घेता यावा यासाठी आम्ही पुढील अंकापासून काही नवीन सदरे उघडण्याचा विचार करीत आहोत.

१. ज्ञातीतील **युवकांना** ज्यांना यात हिरीरीने भाग घ्यायचा आहे त्यांनी आपली नावे व कशा प्रकारची सेवा ते देऊ इच्छितात त्या बद्दल थोडक्यात माहिती द्यावी. आम्ही अवश्य त्या वर विचार विनीमय करून त्यांच्यासाठी खास पुढील काळात 'सदर' उपलब्ध करून देऊ.

२. **महिलांसाठी** खास सदर (ज्यात त्या सोशलवर्क पासून घराच्या टापटिपी बद्दल लिहू शकतात तसेच वेगवेगळे ' नवे पदार्थ' पेश करू शकतात.

पाककृतीमध्ये रुची असणाऱ्या महिलांसाठी हे खास सदर असेल.

३. आजीबाईंचा बटवा : यांत जुन्या पिढीतील अनुभवी वृद्ध महिला कुठल्याही प्रकृतिच्या समस्येवर घरगुती उपाय सुचवू शकतात. आयुर्वेदात ह्या घरगुती औषधांना फार महत्त्व आहे.

४. क्रीडा क्षेत्र : वेगवेगळ्या खेळांचे (घरात तसेच मैदानात खेळायचे) बद्दल माहिती, आधुनिक खेळ पद्धति, काही नवी नियमावली यावर तुम्ही माहिती देऊ शकता.

५. कला क्षेत्र : नाटक, संगीत, नृत्य अशा कलांबद्दल थोडक्यात माहिती द्यावी. उदा. समजा संगीताचा एक राग 'भीमपलास' यावर आज कुणी छोटा लेख लिहिला तर त्याचे आरोह-अवरोह, त्या रागात गायलेली गाणी, तो कधी गायचा किंवा ऐकायचा याचे विवेचन रोचक ठरेल.

६. आपल्या ज्ञातीतील कुणा थोर कलाकाराबद्दल माहिती तुम्ही देऊ शकाल.

वरील लेख, नावाबरोबर संघाच्या ऑफीसमध्ये 'संपादक, मुखपत्रिका' या नावे पाठवावेत.

**– प्रसाद कसबेकर**

**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**

**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## श्री. अरूण कसबेकर यांचे 'मनाचे कवडसे' आठवणींचा बकुळगंध

रात्री अंधारात दिव्यांपुढे लावलेल्या समईतील जळत असलेली ज्योत आठवते. तिचं उदाहरण घेतलं तर बरंच काही शिकवून जाते. अंधाराची पर्वा न करता आपल्या इवल्याश्या प्रकाशात आसमंत उजळून टाकते. ज्योतीचं जळणं दुसऱ्यासाठी असतं. तिचं किंवा मेणबत्तीचं जळणं आठवल्यावर आपल्या जीवनात निष्काम कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती आठवतात.

कधी कधी अचानक गोष्टी घडतात. असाच एक दिवस उजाडला. माझ्या पुस्तकांची प्रकाशिका सिंधू जाधवचा फोन आला. ती लोणावळ्याहून मुंबईला श्री. अरूण कसबेकरांकडे आली होती. तिला मला भेटायचे होते. तिच्या फोनवरून अपरिचित व्यक्ती बोलली. 'मी अरूण कसबेकर. तुम्हाला भेटायला आलो तर चालेल का?' मी होकार दिला. त्यांचे नाव ऐकले होते अन् 'मुखपत्रिके'तील लेख वाचले होते.

त्याच दिवशी ते दोघे मला भेटायला आले. सिंधुने मला तिचे 'मनाचे कवडसे' पुस्तक दिले. गप्पाही झाल्या. खरं म्हणजे लता नायर अर्थात पालेकर मामा (न्यायमूर्ती सुप्रीम कोर्ट) बरोबर माझे जुने संबंध. तिने 'मनाचे कवडसे' या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याबद्दल विचारले होते. परंतु काही वैयक्तिक कारणामुळे मी नम्रपणे नकार दिला. पुस्तकाची प्रस्तावना श्री. डी. एन्. ने छानच लिहिली आहे. माझ्या इतर व्यापातून वेळ काढून पुस्तक सावकाश वाचून काढले. आणि म्हणूनच मला ज्योत आठवली. कसबेकरांनी बरेच कार्य (समाजासाठी) केले आहे.

लेखकाने आपल्या लेखात प्रांजळपणे, सडेतोड अन् परखडपणे आपले मनोगत, केलेले कार्य, मुलाखती, बरेवाईट अनुभव, केलेली मदत, केलेल्या चुका अन् जवळच्या – दूरदूरच्या अनेक व्यक्तींचा परिचय दिला आहे. मला आठवतात त्या 'हिरामामी' होय. त्या पालेकरमामाकडे बरेच दिवस होत्या. त्यामुळे मी त्यांच्या संपर्कात आले. त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ लता बरोबर पुण्याला गेले होते. तसेच पी.डी. कसबेकरांच्या पत्नी या माझ्या यजमानांची सख्खी आतेबहीण. असे अनेक नातेवाईक मला परिचित असून लेखकांनी त्यांचे सुंदर अन् समर्पक शब्दात वर्णन केले आहे. प्रत्येक ज्ञाति बांधवांनी हे पुस्तक जरूर वाचावे असे वाटते.

ह्या बालपणींच्या आठवणी होत. अंगावर अलगद मोरपीस फिरवावे तसेच आज झाले. समज आल्यावर वरील कामानिमित्त कारवारला आम्ही जात असू. पुढे विवाह झाल्यावर माझ्या सासरी (नेल्लेकरी–कुमठा) मी मुंबईहून माहेरी आल्यावर जात होते. त्यामुळे कारवारचा एस्.टी.



स्टँड, कॉनव्हेंट, चर्च, बेतखोलची खाडी, चेंड्ये, तोडूर वगैरे काही नावे आठवतात. 'मनाचे कवडसे' वाचताच अनेक सुखद आठवणीही मनाची तार झंकारली.

या लेखाला मी 'आठवणींचा बकुळगंध' असे शीर्षक दिले आहे. कारण बकुळी (ओवळा) ची फुले सुकली तरी त्यांचा सुगध दरवळत असतो.

मला इतकेच सांगावेसे वाटते की श्री. अरूण कसबेकरांना भविष्यात अशीच शांताई अन् मंगेशाचा वरदहस्त सतत राहो अन् अशीच सत्कार्ये अन् लिहिण्याची प्रेरणा मिळो हीच माझी सदिच्छा...

धन्यवाद.

**कुंदा रं. देसाई**
९८१९०४२३१९

### श्रद्धांजली



**श्री सदानंद शिवराव वागळे**
देवाज्ञा २३–०४–१९९५



**श्रीमती कमला सदानंद वागळे**
देवाज्ञा १०–०६–२०१६

स्वार्थाचा स्पर्श नव्हता. गर्वाचा लवलेश नव्हता ।
होती फक्त माणुसकी, होता आपलेपणाचा जिव्हाळा ।
क्षण असा नाही की, आई–बाबा तुमचे स्मरण नाही ।
श्वास असा नाही की तुमचा भास नाही ।।
तुमच्या पवित्र आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली.

**– विजय सदानंद वागळे – ९२२१६०७५७७**



**श्रीमती स्मिता नाडकर्णी यांचे पाककलेवरील 'Smita's GSB Treasure' नावाचे You tube channel**

(दहिसर येथे राहणारे कै. अजित विठ्ठल (ब्रुकबाँड) नाडकर्णी यांच्या पत्नी श्रीमती स्मिता या पाककलेमध्ये कुशल आहेत. आपल्या ज्ञानाचा इतरांना उपयोग व्हावा म्हणून त्यांनी **'Smita's GSB Treasure'** या नावाचे **You tube channel** सुरू केले आहे. त्यातील एक पाककृती त्यांच्याच शब्दात.)

### ४. काकडीचे घारगे

**साहित्य –** एक वाटी गूळ, एक वाटी तांदळाचं पीठ, एक वाटी गव्हाचं पीठ, अर्धा वाटी किसलेलं खोबरं, एक वाटी काकडीचा कीस, तीन टीस्पून शेंगदाण्याचे तेल, दोन टीस्पून पांढरे तीळ.

घारगे तळण्यासाठी शेंगदाण्याचे तेल.

**कृती :–** प्रथम गॅसवर काकडीचा कीस तीळ खोबरं आणि गूळ काकडीचा कीस पाण्यासकट भिजत घालावा. चवीसाठी थोडं मीठ घलावे. उकळी आल्यावर तेलाचं मोहन घालावं तसेच तांदूळ पीठ आणि गव्हाचे पीठ एकत्र करून त्यामध्ये जेवढे पीठ जाईल तेवढे पीठ घालून शिजवावे. एक वाफ देऊ द्यावी. गॅस बंद करावा. पीठ थंड होऊ द्यावं आणि छानपैकी मळून घ्यावं. त्याच्यामध्ये गुठळ्या राहू देऊ नयेत. पीठ मळून झाल्यानंतर त्याचे पेढ्याएवढे पोळ्यांपेक्षा जास्त मोठे गोळे घेऊन वडे थापावेत. तेलामध्ये तळून घ्यावेत.

ही रेसिपी लाईव्ह पाहण्यासाठी स्मिता जीएसबी ट्रेजरला लाईक करा, शेअर करा, सबस्क्राईब करा!

**–स्मिता अजित नाडकर्णी,** दहिसर
९३२४३ ८३०२२



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवाश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफिस,
अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

SERVICE FIRST®

98193 04599 99204 04599

SOCIETY SERVICE RESOURCE
समाजसेवा समृद्धि

सर्वप्रथम सेवा®
SOCIETY SERVICE RESOURCE

**।। कालाय तस्मै: नम: ।।**

| | | |
|---|---|---|
| आशुतोष पुरुषोत्तम बोरकर | (सदाशिवगड) | कांदिवली |
| उज्वला उमानाथ दिवेकर<br>(पूर्वाश्रमीच्या लता बळवंत बोरकर) | (कडवाड) | वाशी |
| माधवी देविदास बोरकर | | मीरारोड |
| सुमती नीळकंठ गायतोंडे | (मर्गे) | लोणावळा |
| विद्या दुर्गादास कसबेकर | (कडवाड) | गोरेगांव |
| अनिल भवानीशंकर कसबेकर | (कडवाड) | पुणे |
| काशिनाथ वामन कसबेकर | (खारगे) | खारगे |
| शुभालक्ष्मी (उषा) प्रकाश कुलकर्णी | (किन्नर) | ठाणे |
| विश्वेश्वर सदाशिव लिमये | (अंकोला) | अंधेरी |
| स्मिता प्रकाश मुझुमदार | (अंकोला) | बांद्रा |
| माधुरी मधुकर नाडकर्णी | (अंकोला) | दादर |
| नलीनी भवानीशंकर नाडकर्णी | (मल्लापूर) | वांद्रे |
| शरयु दत्तात्रय नाडकर्णी | (सावर पै) | पारले |
| ताराबाई (सुंदऱ्याना) भालचंद्र पालेकर | (ओर्के) | गिरगांव |
| सुमन अरविन्द फेणे | (चेंडीये) | पारले |
| सुहास नागेश साखरदांडे | (हळगे) | मुलुंड |
| शालिनी भालचंद्र स्थळेकर | (अंकोला) | अहमदाबाद |
| वीणा दत्तात्रय तेलंग | (हाटवाड) | पुणे |
| गोविन्द मर्नोळा तेलंग | (केटवडी) | माहीम |
| कौमुदी दिगंबर (सूर्यकांत) तेलंग | (बाड) | वाळकेश्वर |
| शैला शिवाजी तेलंग | (नंदव्हाळ) | पारले |
| शांता श्रीकुमार (अतुल) वैद्य | (यल्लापूर) | जोगेश्वरी |
| अरूण श्रीपाद वाघ | (सदाशिवगड) | शिकागो |
| श्रीकांत दत्तात्रय वाघ | (सदाशिवगड) | पारले |
| सदाशिव (विजय) शिवाजी वागळे | (बाड) | पारले |
| *प्रमोद वसंत वागळे | (माजाली) | जोगेश्वरी |
| अनसूया अजित वर्टी | (सदाशिवगड) | पिंपरी |
| अजित महाबळेश्वर वर्टी | (सदाशिवगड) | वरळी |
| पुष्पा मधुकर झणकर<br>(पूर्वाश्रमीच्या पुष्पा दत्तात्रय नाडकर्णी) | (अंकोला) | पुणे |

* श्री. प्रमोद वागळे यांनी देहदान केले आहे.



## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या (मागील अंकानंतर) उल्लेखनीय देणग्या

**श्री. अमोल कसबेकर यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीस**
**चार लाख रुपयांची देणगी**

पूर्वीच्या पिढीतील डॉ. गजानन शांताराम कसबेकर यांनी पिंपरी येथील पेनीसिलीन फॅक्टरी व पनवेल येथील हिंदुस्थान ऑर्गेनिक फॅक्टरी या उभय कारखान्यांच्या उभारणीत महत्त्वाचे योगदान दिले होते. डॉ. कसबेकर यांचे एक सुपुत्र श्री. प्रमोदकुमार कसबेकर यांचे सुमारे तीस वर्षांपूर्वी जोगेश्वरी येथे दु:खद अपघाती निधन झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव श्री. अमोल कसबेकर यांनी अलीकडेच चार लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही**
**१ लाख ५३ हजार ३ रुपयांची देणगी**

सदाशिवगड माध्यमिक शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करून नावलौकिकास आलेले श्री. शरद सलगर यांचे अकरा वर्षांपूर्वी दु:खद निधन झाले होते. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतीवर्षी पतीच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीसाठी, वृद्धसेवा निधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी रु. ५१००१ याप्रमाणे एकूण १,५३,००३ रुपयांच्या देणग्या देतात. यंदाही त्यांनी अशाच देणग्या दिल्या आहेत.

**श्रीमती कौमुदी तेलंग यांच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीवर**
**८० हजार रुपयांची देणगी**

वाळकेश्वर येथे रहाणाऱ्या श्रीमती कौमुदी दिगंबर (सूर्यकांत) तेलंग या एक निरलस समाजसेविका होत्या. विशेषत: समाजाच्या तळागाळातील कुपोषणग्रस्त मुलामुलींचे संगोपन करणाऱ्या संस्थेचय त्या कार्याध्यक्षा होत्या. विशेषत: अनाथ बालकांना रीतसर कायद्याला अनुसरून दत्तक देण्याच्या कार्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय होते. श्रीमती तेलंग यांचे जानेवारी महिन्यात वृद्धापकालाने निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचं माहीम येथे राहणारे दीर श्री. आर. नारायन तेलंग यांनी संघाच्या समाजसेवा निधीसाठी ८० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. अनंत महादेव गंडभीर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी वृद्धसेवा निधीसाठी**
**पन्नास हजार रुपयांची देणगी**

मूळ कणसगिरी येथील कै. अनंत महादेव गंडभीर यांचे यंदा जन्मशताब्दी वर्ष. या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे दोन पुत्र डॉ. निनाद व श्री. शैलेश यांनी वृद्ध सेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे. डॉ. निनाद यांना अलीकडेच प्रतिष्ठित दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. त्याचा तपशील याच अंकात पृ. ५ वर दिला आहे.

**श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी**

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी हे ज्ञातीच्या संदर्भातील क्षेत्रात विशेष रस घेत असत. त्यांनी व त्यांच्या पश्चात आप्तेष्टांनी अनेक वेळा संघाला भरघोस देणग्या दिल्या आहेत. गेल्या वर्षी त्यांचा नातू श्री. कवीश दुर्गानंद (मच्छिंद्र) कसबेकर, नातसून अरुंधती व पणती रिया यांनी वृद्धसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली होती. अलीकडेच त्यांनी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. अनंत केशव तेलंग यांजकडून एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी**

गदग येथे वास्तव्याला असणारे मूळ शिगली या गांवचे श्री. अनंत केशव तेलंग यांनी पूर्वी मुलगा सचिन याच्या शिक्षणासाठी एज्युकेशन सोसायटीकडून शिष्यवृत्ती घेतली होती. त्या कृतज्ञतेच्या पोटी अलीकडेच श्री. तेलंग यांनी एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**संघास मिळालेल्या देणग्या**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री कमलाकर यशवंत तेलंग यांच्या ५ व्या पुण्यतिथी प्रसंगी पत्नी श्रीमती सुरेखा (सुमन) तेलंग यांजकडून | ५,००० |
| २. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| ३. | श्रीमती शैलजा अरुण सोहोनी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. गौरीश व कन्या श्रीमती आरती बोरकर यांजकडून | ५,००० |
| ४. | श्रीमती संध्या यांच्या ५६ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ आई श्रीमती श्यामला माधव कामत यांजकडून | १,००१ |
| ५. | श्रीमती नीना (सुमन) दिगंबर कसबेकर यांच्या २१ व्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. दिगंबर कसबेकर व कन्या श्रीमती संध्या व सुजाता यांजकडून | १,००१ |
| ६. | एन्.के.जी.एस्.बी. को-ऑप. बँकेकडून २०२२-२३ करिता | १०,००० |
| ७. | श्रीमती कौमुदी दिगंबर तेलंग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्री. शरद नारायण तेलंग यांजकडून | ८०,००० |



**वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. के. वागळे यांजकडून | ५,००१ |
| २. | श्री. जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा जिवा सरदेसाई यांजकडून | २५,००० |
| ३. | श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शांता कामत यांजकडून | २५,००० |
| ४. | श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम वाघ यांच्या कन्या श्रीमती शुभांगी जोशी यांजकडून | १०,००० |
| ५. | श्री. माधव नायक यांच्या वाढदिवस प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती मानसी आजेय नायक यांजकडून | १,५०० |

**वृद्धसेवानिधीसाठी**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ नातू श्री. कवीश, नातसून श्रीमती अरुंधती व पणती कु. रिया यांजकडून | ५०,००० |
| २. | श्री. आशुतोष पुरुषोत्तम बोरकर यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त कन्या कु. गौरी बोरकर यांजकडून | १०,००० |
| ३. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| ४. | श्रीमती मोहाना व श्री. दिगंबर देसाई यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती पल्लवी शशांक तेलंग यांजकडून | १०,०००१ |
| ५. | श्री. अनंत महादेव गंडभीर यांच्या जन्मशताब्दी निमित्त पुत्र डॉ. निनाद व शैलेश गंडभीर यांजकडून | ५०,००० |
| ६. | श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम वाघ यांच्या कन्या श्रीमती शुभांगी जोशी यांजकडून | १०,००० |
| ७. | श्रीमती विमल व श्री. गजानन सिताराम बोरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. सिताराम व दिपक यांजकडून | १०,००० |

**एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या**


| | | |
|---|---|---|
| १. | श्री. विठ्ठल वामन नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुचेता व कन्या कु. राधिका, रिह्या यांजकडून | ५,००० |
| २. | श्री. विजयानंद दिनकर बोरकर यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती फाल्गूनी हिच्या विवाह प्रसंगी बंधू श्री. मिलिंद बोरकर यांजकडून | २,००१ |
| ३. | श्री. जी. डी. वागळे यांजकडून | ५,००१ |
| ४. | श्री. प्रमोदकुमार गजानन कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अमोल कसबेकर यांजकडून | ४,००,००० |
| ५. | श्री. सदानंद दत्तात्रय तेलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती किशोरी तेलंग यांजकडून | २१,००० |
| ६. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| ७. | श्री. नागेश गोविंद पालेकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. प्रकाश पालेकर यांजकडून | २,५०१ |
| ८. | श्री. अनंत केशव तेलंग यांजकडून | ५०,००० |
| ९. | श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम वाघ यांच्या कन्या श्रीमती शुभांगी जोशी यांजकडून | १०,००० |
| १०. | एन्.के.जी.एस्.बी. को–ऑप. बँकेकडून २०२२–२३ करिता | १०,००० |
| ११. | श्री. यशवंत मर्तोबा नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती तारा नाडकर्णी यांजकडून | २१,००० |

**ठाणे मंच देणगीदारांची यादी**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रकाश मदुकर तेलंग जोगेश्वरी | ६,००० |
| २. | श्रीमती सुहासिनी सदानंद नाडकर्णी, माहीम | ५,००० |
| ३. | श्रीमती सीमा चंद्रहास कामत, जोगेश्वरी | १,००० |



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.